# नाशिक महानगरपालिका नाशिक

# आरोग्य विभाग,

# मटन व मासळी यांचे नियमना करीता उपविधी

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या (अनुसूची ड चे प्रकरण पंधरा व कलमे ३८१ (अ) व ३८६ आणि ) कलम ४५८ चे खंड (२७), (२८) आणि (४८) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन नाशिक शहराच्या महानगरपालिकेकडून करण्यात आलेले पुढील उपविधी प्रस्तावित करणेत येत आहेत. त्याचप्रमाणे अधिनियमाच्या कलम ४६० द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे पूर्व प्रसिध्दीनंतर आणि कलम ४६१ अन्वये महाराष्ट्र शासनाने कायम केल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम ४६२ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात अंतिमरीत्या प्रसिध्द करण्यात येतील.

**१. संक्षिप्त नाव -**

या उपविधींना नाशिक महानगरपालिका मटण आणि मासळी दुकानांचे विनियमन उपविधी-२००८' असे म्हणावे.

२) व्याख्याः- १) विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसेल तर या उपविधीत

**(अ) अधिनियम याचा अर्थ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई एकोणसाठ) असा आहे.**

(ब) शहर याचा अर्थ अधिनियमाच्या कलम ३ अन्वये गटित केलेले नाशिक शहर असा आहे

(क) लायसन याचा अर्थ मटणाचे दुकान किंवा मासळीचे दुकान चालविण्यासाठी लायसन असा आहे.

(ड) लायसन प्राधिकारी याचा अर्थ, त्या शहराचे महानगरपालिका आयुक्त किंवा या अधिनियमान्वये आयुक्ताकडे सोपविलेले, प्रदान केलेले किंवा विहित केलेले अधिकार कर्तव्ये आणि कार्य पार पाडण्यासाठी अधिनियमाच्या कलम ६९ अन्वये ज्याला अधिकार प्रदान करण्यात आले आहेत असा कोणताही अन्य महानगरपालिका अधिकारी असा आहे.

(इ) लायसन धारक याचा अर्थ, या उप-विधीखालील वैद्य लायसन धारण करणारी व्यक्ती असा आहे.

(ई) मटण याचा अर्थ मानवी आहारासाठी योजलेले कोणताही पशु किंवा पक्षी यांचे मांस असा आहे. मासळी याचा अर्थ मानवी आहारा साठी योजलेले कोणत्याही जलचर अथवा उभयचर जीवाचे मांस असा आहे.

(उ) मटणचे दुकान आणि मासळीचे दुकान याचा अर्थ शहरातील जेथे मटन किंवा यथास्थिति मासळी किंवा दोन्ही ही विकली जाते किंवा विक्रीसाठी ठेवण्यात येते अशी कोणतीही बंदिस्त जागा असा आहे,

२. या उपविधीमध्ये वापरण्यात आलेले आहेत परंतु यात ज्याची व्याख्या केलेली नाही असे शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमात जो अर्थ नेमून दिलेला असेल अनुक्रमे तोच अर्थ असेल.

३. मटणाचे दुकान आणि मासळीचे दुकान यांचे नियंत्रण आणि देखरेख - प्रत्येक मटणाचे दुकान आणि प्रत्येक मासळीचे दुकान आयुक्तांच्या नियंत्रणाच्या अधिनतेने महानगरपालिकेच्या बाजार निरिक्षकांच्या किंवा याबाबत आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आला असेल अशा कोणत्याही अन्य महानगरपालिका अधिका-याच्या निरिक्षणाखाली आणि सर्वसाधारण देखरेखीखाली असेल.

४. **लायसनसाठीः** - (१) मटणाचे दुकान आणि मासळीचे दुकान चालविण्याची इच्छा असणारी प्रत्येक व्यक्ती लायसन घेण्यासाठी लायसन प्राधिका-याने विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात आणि लायसन देणा-या प्राधिका-याने निश्चित केले असेल अशा तपासणी शुल्कासह आयुक्तकडे लेखी अर्ज सादर करेल.

(२) अर्जाची छाननी झाल्यावर लायसन प्राधिकारी एकतर लायसन देण्यास नकार देईल किंवा या उपविधी सोबत जोडलेल्या 'अ' जोडपत्र मध्ये विनिर्दिष्ट केलेले निर्बध व शर्ती यांच्या अधिनतेने आणि अशा नमुन्यात आयुक्त महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरीने निर्धारित करतील अशी लायसन फी आणि प्रतिभूती ठेव याचे

प्रदान केल्यावर आयुक्त विनिर्दिष्ट करतील अशा अटी व शर्तीच्या अधीनतेने वार्षिक लायसन देईल. परंतु जेव्हा लायसन देण्यास नकार दिला जाईल तेव्हा त्याबाबतची कारणे अर्जदाराला कळविण्यात येतील.

५. मटणाचे दुकान किंवा मासळीचे दुकान यासाठी लायसन देण्यात येणार नाही अशी प्रकरणेः- मटणाचे दुकान किंवा आणि मासळीचे दुकान यांसाठीचे लायसन पुढील प्रकरणांमध्ये देण्यात येणार नाहीत.

**(एक)** जेथे मटणाचे दुकान किंवा मासळीचे दुकान चालविण्याचा उद्देश असेल ती जागा, कोणतीही धार्मिक ठिकाण किंवा उपासनेची जागा किंवा कोणतीही शैक्षणिक संस्था यांच्यापासुन १०० मिटर त्रिज्येच्या आत असल्यास,

**(दोन)** मटणांचे दुकान किंवा मासळीचे दुकान यासाठी निवडलेली जागा ही, त्यावेळी अंमलात असलेल्या विकास नियंत्रण उप- विधीनुसार असणा-या झोनशी जुळणारी नसल्यास,

**(तीन)** मटणांचे दुकान किंवा मासळीचे दुकान यासाठी निवडलेली जागा ही, कोणतेही केस कापण्याचे दुकान, कोळशाचे दुकान, पिठाची गिरणी सर्व्हीस स्टेशन किंवा दवाखाना यापासून १५ मीटर अंतराच्या आत असल्यास,

**(चार)** मटणाच्या दुकानाचे किंवा मासळीचे दुकानाचे माप कोणत्याही एका बाजूने २.४मिटर कमी आणि उंची ३ मिटर कमी असल्यास आणि किंवा ते दुकान त्यावेळी अंमलात असलेल्या विकास नियंत्रण उप-विधीनुसार नसल्यास.

**(पाच)** मटणाचे दुकान किंवा मासळीचे दुकान चालविण्यासाठी वापरावयाची कोणतीही परिवास्तू ही अंमलात असलेल्या कायद्याच्या तरतुदीनुसार अनाधिकृत बांधकाम असल्यास,

**(सहा)** अर्जदार कोणत्याही महानगरपालिकेच्या देण्याच्या बाबतीत, थकबाकीदार असल्यास

६. लायसन देणे पूर्वी जागेचा, अर्जदाराचा तपशील ज्या जागेवर धंदा करण्यासाठी लायसेन्स मागीतले आहे, त्या जागेवर लायसेन्स

धारकाचा जो हक्क असेल म्हण्जे मालकी भाडेकरुपणा, लिव्ह ॲन्ड लायसेन्स लीज इ. त्यासंबंधीचे अधिकृत कागदपत्र अर्जासोबत दाखल करणे आवश्यक आहे. व त्या जागेसंबधी म्युनिसीपल कॉरपोरेशन ची कोणतीही थकबाकी नसल्याचा दाखला सोबत जोडणे आवश्यक आहे. ज्यातील अर्जदाराचे हक्कासहित नमुद करुन वृत्तपत्रात अर्जदाराचे स्वखर्चने ठळक रित्या जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येईल. व त्यावर लगतच्या १०० मी त्रिज्येच्या परिसरातील नागरीकांच्या सुचना/हरकती मागवणेत येतिल. त्यामधील हरकतीचा विचार करुन लायसन्स देणे बाबत पुढील निर्णय घेणेत येईल. व तो अर्जदारावर बंधनकारक असेल.

**<u>लायसनधारकाची कर्तव्येः-</u>**

१. लायसनधारक आपले दुकान चांगल्या दुरुस्त केलेल्या आणि आरोग्यपूर्ण परिस्थितीत ठेवावे.

२. लायसनधारक, लायसन प्राधिका-याने मान्य केलेल्या आकाराची व पद्धतीची एक कचरापेटी, आपल्या दुकानात किंवा दुकानाच्या जवळ ठेवील आणि त्या कचरापेटीचा दैनंदिन फरशीवरील झाडलोटीतून निघणारा कचरा, हाडांचे तुकडे, शिळे मांस आणि असे अन्य टाकाऊ पदार्थ साठविण्यासाठी वापर करील आणि अशाप्रकारे साठविलेल्या गोष्टी दररोज किंवा आवश्यक असेल तर, थोडया थोडया कालांतराने निदेश दिले असतील त्यानुसार घंटागाडीत रिकामे करण्याची व्यवस्था करील. तसेच सदर कचरा पेटी कायम झाकलेल्या परिस्थितीत ठेवणेची व्यवस्था करणेची आहे.

३. लायसनधारक, आपल्या दुकानात, गुळगुळीत तंदूर दगडाचा किंवा गुळगुळीत शहाबादी दगडाचा किंवा संगमरवरी दगडाचा पृष्ठभाग असणारा विटांचा उतरता चबुतरा बांधील असा चबुतरा लायसन प्राधिका-याने विहित केला असेल अशा आकाराचा असेल.

४. लायसनधारक दुकानातील जमिनीवर, गुळगुळीत शहाबादी दगड किंवा संगमरवर किंवा मोझॅक फरशी बसविण्याची व्यवस्था करील.

५. लायसनधारक आपल्या दुकानातील वस्तू त्या बाजूने जाणा-यांना दिसू नयेत म्हणून दुकानाच्या समोर विभाजक किंवा योग्य आकाराचा पडदा लावण्याची व्यवस्था करील.

६. लायसनधारक, आपल्या दुकानातील चबुत-याचा पुढचा भाग व दुकानाच्या जमिनीच्या पृष्ठापासून चार फूट उंचीपर्यन्तच्या भिंती यांना चमकणा-या फरशा लावण्याची व्यवस्था करील आणि चबुत-याचा उर्वरीत भाग आणि भिंतीचा उरलेला भाग यांना प्रत्येक वर्षी ऑईलपेन्ट लावण्याची व्यवस्था करील.

७. तसेच लायसनधारक दुकानातील लाकडी सामान आणि दुकानाचे छत यांनाही दरवर्षी ऑईलपेन्टने रंगविण्याची व्यवस्था करील.

८. लायसनधारक दिवसाचे कामकाज पूर्ण झाल्यावर दररोज आपले दुकान धुण्याची आणि जंतुनाशकाची फवारणी करण्याची व्यवस्था करील आणि तसेच दुकानाच्या समोरचा व लगत सभोवतालचा परिसर नेहमी स्वच्छ ठेवण्याची व्यवस्था करील.

९. लायसनधारक आपल्या दुकानातील हवा खेळती राहील याची निश्चिती करण्यासाठी पुरेशी वायुवीजनाची व्यवस्था करील आणि प्रत्येक खिडकी आणि झरोक्याला लायसन देणारा प्राधिकारी फर्मावील त्याप्रमाणे योग्य पडदे किंवा बारीक वायरने विणलेली जाळी लावण्याची व्यवस्था करील.

१० लायसनधारक, लायसन प्राधिका-याकडून विहित करण्यात येईल अशा आकाराच्या एका न्हाणीची किंवा धुण्याच्या जागेची पाण्याच्या नळासह व्यवस्था करील .

११. लायसनधारक आपल्या दुकानाचा राहण्याच्या प्रयोजनासाठी वापर करणार नाही.

१२. लायसनधारक कत्तल केलेल्या प्राण्याची धडे किंवा मांस आपल्या दुकानात केवळ बंद पेटीतुनच आणील.

१३. लायसनधारक, आपल्या दुकानात मांसाचे किंवा मासळीचे तुकडे करण्यासाठी किंवा खिमा करण्यासाठी तुकडे करण्याच्या तीनपेक्षा अधिक जागा (चॉपिंग बॉक्स) किंवा कुंडे ठेवणार नाही आणि दिवसभराचे काम संपल्यानंतर अशा जागा किंवा कुंडे घासून व खरवडून काढण्यात येतील आणि ते धुवून स्वच्छ ठेवण्यात येतील.

१४. मटणाच्या दुकानाच्या बाबतीत लायसनधारक आपल्या दुकानात

विक्रीसाठी असलेले मांसाचे तुकडे किंवा प्राण्याची धडे टांगून ठेवण्यासाठी पुरेशा प्रमाणात स्टेनलेस स्टिलच्या कांबी (बार) किंवा आकडे (हूक) लावण्याची व्यवस्था करील.

१५. लायसनधारक कत्तल केलेल्या प्राण्यांची धडे किंवा मांसाचे तुकडे महानगरपालिकेच्या कत्तलखान्यातून किंवा प्राधिकृत लायसनधारक पुरवठाधारकाकडून खरेदी करील.

१६. लायसनधारक कोणतेही शिळे किंवा आरोग्यास हनिकारक असलेले मांस किंवा मासे विक्रीला ठेवणार नाही किंवा विकणार नाही.

१७. लायसनधारक जनावरांची कत्तल मनपा अधिकृत
कत्तलखान्यातुनच करील. करवून घेईल.

**१०. लायसनचा कालावधीः - या उप-विधीअन्वये देण्यात येणारे प्रत्येक लायसन हे वार्षिक लायसन असेल आणि ते दर वर्षाच्या ३१ डिसेंबरपर्यत असेल.**

११. **प्रतिभूती ठेवः-** लायसन फीच्या व्यतिरिक्त अर्जदाराला लायसनच्या शर्तींचे आणि अशा लायसनचे नियमन करणा-या अधिनियम नियम आणि उप-विधी यांचे अन्य उपबंध किंवा अशा लायसनच्या संबंधातील स्थायी आदेश यांच्या तरतुदींचे विश्वासपूर्ण पालन करण्यासाठी मा. आयुक्त मनपा ठरवेल अशी प्रतिभूती ठेव बिनव्याजी देणे देखील आवश्यक असेल.

१२. **लायसनचे नवीकरणः-** (१) लायसनच्या नवीकरणासाठीचा अर्ज, लायसनच्या फीसह लायसनच्या समाप्तीच्या तारखेपूर्वी, लायसन प्राधिका-याकडे करण्यात येईल.(२) लायसनच्या नवीनकरणासाठीचा अर्ज मिळाल्यावर लायसनच्या किंवा या उप- विधीच्या कोणत्याही कोणत्याही शर्तींचे उल्लंघन झालेले नसेल तर लायसन प्राधिकारी लायसनचे नवीकरण करील. लायसन प्राधिका-याचे जर लायसनचे नवीकरण करण्याला नकार देता येईल. लायसनच्या नवीकरणास नकार देण्यात आला असेल तर, लायसनधारकास त्याबाबतची कारणे कळविण्यात येतील. लायसन फीसह लायसनच्या नवीकरणासाठीचा अर्ज ३१ डिसेंबर पूर्वी करण्यात यावा. असे

करण्यात आले नाही तर १ जानेवारी पासून प्रत्येक महिन्यासाठी मा. आयुक्त वेळोवेळी ठरवील इतके विलंब शुल्क आकारण्यात येईल. आणि जर लायसन फीसह लायसनच्या नवीकरणासाठीचा असा अर्ज ३० जुन पूर्वी करण्यात आला नाही तर त्या लायसनचे नवीकरण करण्यात येणार नाही जास्तीत जास्त उशिरा म्हणजे विलंब श्रेणीचा आकार दर विलंबीत महिण्यास चढत्या श्रेणीने राहील. फी पुर्ण विलंब शुल्कासह वसुल करणेत येऊन लायसनधारकास नवीन लायसनसाठी अर्ज करावा लागेल.

१४. **लायसनचे निलंबित करणे आणि रद्द करणे :-**

(१) **जर लायसन प्राधिका-यास**

**(एक)** कोणत्याही लायसनधारकाने चुकीचे अभिवदन करुन किंवा लबाडीने लायसन मिळविले आहे किंवा

(दोन) लायसन ज्या निर्बधाच्या व शर्तीच्या अधीनतेने दिले होते त्यापैकी कोणत्याही निर्बधाचे आणि शर्तीचे लायसनधारकाने उल्लंघन केले आहे किंवा त्याच्या पालनाबाबत टाळाटाळ केली आहे किंवा

(तीन) मटनाच्या दुकानाला किंवा मासळीच्या दुकानाला लागू असणा-या अधिनियम नियम किंवा उप विधी यांच्या कोणत्याही तरतूदीचे लायसनधारकाकडून उल्लंघन झाले आहे, किंवा

(चार) मटणाचे दुकान किंवा मासळीचे दुकान बंद करण्यास भाग पाडणारी इतर कोणतेही कारणे आहेत.

याबाबत विश्वास वाटण्यास कारण असेल तर लायसन प्राधिका-याला विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी लायसनचे निलंबन करता येईल किंवा लायसन रद देखील करता येईल.

(२) अ-) आयुक्त नाशिक म.न.पा. यांना अथवा त्यांनी प्राधीकृत केलेल्या अधिका-यास आदेशात नमुद केलेल्या कारणांसाठी व नमुद केलेल्या मुदतीकरीता अनुज्ञाप्ती निलंबीत करता येईल. सदर निलंबन आदेशा विरुध्द संबंधित अनुज्ञाप्ती घारक मा. आयुक्त, ना.म.न.पा. यांचंकडे आदेशाच्या तारखेपासुन दहा दिवसाचे कालावधीत दाद मागु शकेल व आयुक्त ना.म.न.पा. त्यास यथा स्थिती सुनावणी देऊन पुढील योग्य ते आदेश पारित करु शकतील. निलंबन कालावधीत सदर व्यवसाय करता येणार नाही.

ब-) लायसन रद्द करणारा आदेश काढण्यापूर्वी लायसन प्राधिकारी लायसनधारकासाठी एखाद्या विनिर्दिष्ट कालावधीत त्याचे लायसन यथास्थिति रद का करण्यात येऊ नये याबाबत उक्त नोटीसीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत कारणे देण्यास फर्मावणारी नोटीस काढील.

(३) लायसनधारकाने लायसन देणा-या प्राधिका-याने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत कारणे दाखविण्यात कसूर केली किंवा लायसन प्राधिका-याचे समाधान होईल अशी कारणे दाखविण्यात तो अयशस्वी ठरला तर, लायसन प्रधिका-याला एखाद्या विनिर्दिष्ट कालावधीसाठी लायसनधारकाचे लायसन निलंबित करता येईल किंवा यथास्थिति ते पूर्णपणे रद करता येईल.

(४) लायसन निलंबित करण्यात आल्यावर जर व्यवसाय करण्यात आला तर तो लायसनशिवाय करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि अगोदरच दिलेली लायसन फी आणि प्रतिभूती ठेव जप्त होईल. लायसन्स रदद झाल्यावर मात्र लायसंस फी आणि प्रतिभूती ठेव जप्त करणेत येऊन ती रक्कम नाशिक महानगरपालिकेच्या खजिन्यात जमा करणेत येईल. तसेच विना परवाना दुकान चालु राहिल्यास अशा प्रत्येक दिवसासाठी रक्कम रुपये १००/- दंड आकारण्यात येईल.

१७ **निरसन व्यावृत्ती** :- हे उप विधी अंमलात येण्यापूर्वी त्यावेळेपूरते अंमलात असलेले उपविधी आणि नियम हे उप-विधी अंमलात आले असतील त्या तारखेस आणि तेव्हापासून निरसित होतील.

**जोडपत्र - अ**

मटण/मासळी दुकान चालविण्यासठी नाशिक शहर महानगरपालिकेचे लायसन.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९) याच्या कलम ३८१ मजुर उपविधी अनुसार,

श्री/श्रीमती/कुमारी. -------------------------------------- यांना नाशिक शहरातील राहण्याचा पुर्ण पत्ता -------------------------------------- या ठिकाणी असलेल्या, दुकानात मटण किंवा मांस विक्रीसाठी याद्वारे लायसन देण्यात येत आहे.

हे लायसन पुढील निर्बध आणि शर्ती यांना अधीन असेल,

**निर्बध व शर्ती** :-

१. हे लायसन ३१ डिसेंबर ------------ किंवा शर्त २ मध्ये तरतुद केलेल्या घोषणेच्या प्रसिद्धीच्या तारखे पासून एका महिन्याच्या कालावधिच्या समाप्तीची तारीख यापैकी जे अगोदर येईल तोपर्यत विधीग्राह असेल.

२. नाशिक शहर (मटण किंवा मासळी दुकानाचे विनियमन) उपविधी

२००८ अंमलात आल्यावर लवकरात लवकर, आयुक्त, या उप-विधीखालील लायसनसाठी अर्ज करण्यासाठी कोणत्याही दोन स्थानिक वर्तमानपत्रात घोषणा प्रसिध्द करील. आणि त्या घोषणेद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे नाशिक शहरातील मटणाचे किंवा मासळीचे दुकान चालविणा-या सर्व व्यक्ती उक्त उप-विधीखालील लायसनसाठी अर्ज करतील अशी घोषणा प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १महिन्याच्या आत लायसनधारक उक्त उप-विधीखालील लायसनसाठी अर्ज करील. जर तो/ती असे करण्यात कसून करील तर तो /ती नाशिक शहरात मटणाचे दुकान किंवा मासळीचे दुकान चालविण्यासाठी विधिग्राह लायसनधारक नसल्याचे मानण्यात येईल.

३. लायसनधारक या लायसनअन्वये ज्या वस्तूची अशा दुकानात विक्री करण्यास किंवा विक्री करण्यासाठी त्याला/तिला प्राधिकृत केले असेल त्या व्यतिरिक्त अन्य कोणतीही वस्तू त्याच्या किंवा तिच्या दुकानातून विकणार नाही किंवा विक्रीसाठी ठेवणार नाही.

४. लायसनधारक लायसन देणा-या प्राधिका-याने किंवा त्याबाबत त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अंशा कोणत्याही महानगरपालिककेच्या अधिका-याने कोणत्याही वेळी तपासणीसाठी मागणी केली असता त्याचे/तिचे लायसन सादर करील.सदर लायसन्स दुकानात दर्शनी भागात सहज दिसेल अशा त-हेने प्रस्थावित केले पाहिजे.

५. लायसनधारकास असा कोणताही सांसर्गिक रोग जडला असेल किंवा कोणतीही जखम किंवा व्रण झाला असेल ज्यामुळे तो/ती मांस किंवा मासळीस स्पर्श करण्यास अयोग्य ठरला असेल तर, कोणत्याही वेळी ते लायसन निलंबित करण्यात येईल. जो पर्यत त्याचा किंवा तिचा असा रोग, जखम किंवा व्रण बरा होत नाही तोपर्यत लायसन निलंबित राहील.

६. लायसनधारक, त्याचे/तिचे दुकान चांगल्या दुरुस्त केलेल्या स्थितीत ठेवील.

७. लायसनधारक, त्याच्या/ तिच्या दुकानात किंवा दुकानाजवळ

लायसन देणा-या प्राधिका-याने मान्य केलेल्या आकारातील एक कचरापेटी ठेवील आणि दैनंदिन साठवणीतील किंवा फरशीवरील झाडलोटीतून निघणारा केरकचरा, हाडांचे तुकडे, शिळे मांस आणि असे अन्य टाकाऊ पदार्थ टाकण्यासाठी तिचा वापर करील आणि अशी साहित्या साठविलेली कचरापेटी घंटागाडीत रिकामे करण्याची व्यवस्था करेल.

८. लायसनधारक, गुळगुळीत तंदूर दगड किंवा गुळगुळीत शहाबादी दगड किंवा संगमरवर याचा चिरेबंदी पृष्ठभाग असणारा एक चबुतरा त्याच्या/ तिच्या दुकानात उभारण्याची व्यवस्था करील. अशा चबुत-याची उंची तिन फूटापेक्षा कमी नसेल आणि त्याची रुदी ४ फुटापेक्षा कमी नसेल आणि त्यांची लांबी त्याच्या व्यवसायासाठी पुरेशी ठरेल अशी असेल.

९. लायसनधारक त्याच्या / तिच्या दुकानातील जमिन गुळगुळीत शहाबादी दगड किंवा संगमरवर किंवा मोझॅक फरशा याद्वारे फरसबंद करण्याची व्यवस्था करेल.

१०. लायसनधारक, त्याच्या/तिच्या दुकानातील जमिन गुळगुळीत शहाबादी दगड किंवा संगमरवर किंवा मोझॅक फरशा याद्वारे फरसबंद करण्याची व्यवस्था करेल.

११. लायसनधारक दुकानातील चबुत-याचा पृष्ठभाग आणि जमिनीच्या पृष्ठभागापासून चार फूट उंचीपर्यतच्या भिंती यांना चमकणा-या फरशा बसविण्याची व्यवस्था करील आणि चबूत-याच्या व भिंतीच्या उरलेल्या भागास, किमान वर्षातून एकदा ऑईलपेंट लावण्याची व्यवस्था करील.

१२. तसेच लायसनधारक, खंड ११ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे दुकानाचे छत आणि लाकडी सामान दरवर्षी ऑईलपेटने रंगवून घेण्याची व्यवस्था करेल.

१३. लायसनधारक दिवसभराचे कामकाज पूर्ण झाल्यावर दररोज आपले दुकान धुण्याची आणि जंतुनाशकाची फवारणी करण्याची व्यवस्था करील आणि तसेच दुकानाच्या समोरचा व लगत सभोवतालचा परिसर नेहमी स्वच्छ ठेवण्याची व्यवस्था करेल.

..१०..

१४. लायसनधारक लायसन प्राधिका-याकडून विहित करण्यात येईल अशा आकारात, दुकानाच्या आतील बाजुस न्हाणीची किंवा धुण्याच्या जागेची पाण्याच्या नळासह व्यवस्था करील.

१५. लायसनधारक आपल्या दुकानात हवा खेळती राहण्यासाठी पुरेशा प्रमाणात खिडक्या व झरोक्यांची व्यवस्था करील आणि प्रत्येक खिडकी आणि झरोक्याला लायसन प्राधिकारी फर्मावील त्याप्रमाणे योग्य पडदे किंवा काचेची तावदाने किंवा बारीक वायरने विणलेली जाळी लावील.

१६. लायसनधारक आपल्या दुकानाचा राहण्याच्या प्रयोजनासाठी वापर करणार नाही.

१७. लायसनधारक, कत्तल केलेल्या प्राण्याची धडे किंवा मासळी आपल्या दुकानात बंद हातगाडीतून किंवा लायसन प्राधिकारी मान्यता देईल अशा प्रकारच्या वाहनातूनच आणील.

१८. मटणाच्या दुकानाच्या बाबतीत, लायसनधारक आपल्या दुकानात विक्रीसाठी असलेले मांसाचे तुकडे किंवा प्राण्याची धडे टांगून ठेवण्यासाठी पुरेशा प्रमाणात स्टेनलेस स्टिलचे कांबी (बार) किंवा हूक (आकडे) लावण्याची व्यवस्था करील.

१९. लायसनधारक, आपल्या दुकानात कुत्रे, मांजर किंवा अन्य पाळीव प्राण्यांना पाळणार नाही तसेच प्रवेश करु देणार नाही.

२०. त्याचे लायसन निलंबित किंवा रद करण्याच्या नोटीशीवर लायसन प्राधिकारी सही करील आणि लायसनधारकास तिच्या/त्यांच्या पत्यावर नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात येईल. लायसन प्राधिकारी नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर लायसन निलंबित किंवा यथस्थिति रद करील.

२१. लायसन समाप्त झाल्यानंतर निलंबित झाल्यानंतर किंवा रद झाल्यानंतर लायसनधारक दुकानातील मटण अथवा मासळी विक्रीचा धंदा तात्काळ थांबवील.

२२. हे लायसन निलंबित किंवा रद झाल्यावर लायसनधारक, या लायसनच्या संबंधात कोणतेही प्रदान मिळण्यास हक्कदार असणार नाही.

२३. लायसनधारकावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ ) याच्या तरतूदी मटण/मासळी दुकान चालविण्याशी जेथवर संबंधित असतील तेथवर बंधनकारक असतील.

२४. **जर लायसन प्राधिका-यास,**

(क) कोणत्याही लायसन धारकाने चुकीचे अभिवदन करुन किंवा लबाडीने लायसन मिळविले आहे,

किंवा

(ख) लायसन ज्या निर्बंधाच्या व शर्तीच्या अधीनतेने दिले होते अशा कोणत्याही निर्बंधांचे व शर्तीचे लायसन धारकाने उल्लंघन केले आहे किंवा त्यांच्या पालनाबाबत टाळाटाळ केली आहे.

(ग) मटणाच्या दुकानाला किंवा मासळीच्या दुकानाला लागू असणा-या मुंबई महानगरपालिका अधिनियम नियम किंवा उप-विधी यांच्य कोणत्याही तरतुदीचे लायसनधारकाकडून उल्लंघन केले आहे.

(एक) याबाबत विश्वास वाटण्यास कारण असेल तर लायसन प्राधिका-याला विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी लायसन निलंबित कराता येईल आणि लायसन प्राधिकारी विनिर्दिष्ट करील अशा कालावधीत त्याचे लायसनन का रद करण्यात येऊ नये याबाबत कारणे दाखविण्यासाठी लायसनधारकास फर्मावील.

(दोन) जर लायसनधारकाने खंड (१) अन्वये लायसन प्राधिका-याने विनिर्दिष्ट केला असेल अश कालावधीत कारणे देण्यात कसूर केली किंवा लायसनधारकाने दिलेल्या कारणांनी लायसन प्राधिका-याचे समाधान झाले नाही तर,लायसन प्राधिका-याला लायसन रद करता येईल.

(तीन) लायसन निलंबित करण्यात आल्यावर लायसनधारकाने प्रदान केलेली लायसन फी परतावायोग्य असणार नाही.

२६. लायसनधारक जनावरांची कत्तल महानगरपालिका अधिकृत कत्तलखान्यातूनच करील.

२७. लायसनधारक कत्तल केलेल्या प्राण्यांची धडे किंवा मांसाचे तुकडे महानगरपालिकेच्या कत्तलखान्यातून किंवा प्राधिकृत लायसनधारक पुरवठाधारकाकडून खरेदी करील.

## नाशिक शहर (खाटीक उद्योग आणि बाजार व कत्तलखाने यांचे विनियमन) उपविधी २००८

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई एकोणसाठ) यांच्या अनुसूची ड चे प्रकरण पंधरा व कलमे ३८१ (अ) व ३८२ आणि ३८६ आणि कलम ४५८ चे खंड (२६), (२७), (२८),(२९) आणि (४८) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन नाशिक शहराच्या महानगरपालिकेकडून करण्यात आलेले पुढील उपविधी अधिनियमाच्या कलम ४६० द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे पूर्व प्रसिध्दीनंतर आणि कलम ४६१ अन्वये महाराष्ट्र शासनाने कायम केल्यानंतर उत्क अधिनियमाच्या कलम ४६२ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात अंतिमरीत्या प्रसिध्द करण्यात येतील.

### १) संक्षिप्त नाव -

या उपविर्धीना नाशिक शहर (खाटीक उद्योग आणि बाजार व कत्तलखाने यांचे विनियमन) उपविधी २००८ असे म्हणावे

### २५.व्याख्या

(१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या उपविधीत

(क) आयुक्त याचा अर्थ कलम ३६ अन्वये नेमलेला शहराचा आयुक्त असा आहे आणि त्यात कलम ३९ अन्वये नियुक्त केलेल्या हंगामी आयुक्तांचा समावेश होतो.

(ख) अधिनियम याचा अर्थ, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (१९४९ चा मुंबई एकोणसाठ ) असा आहे.

(ग) लायसन फी किंवा परवाना फी याचा अर्थ कोणतेही लायसन किंवा कोणताही परवाना यासंबधातील अटी, लायसन किंवा परवाना देण्यासाठी अधिनियमाच्या कलम ३८६ पोटकलम (२) अन्वये आयुक्तांनी वेळोवेळी निश्चित केलेली फी असा आहे.

(घ) लायसन याचा अर्थ या उपविधीखाली दिलेले लायसन असा आहे.

(ड) लायसनधारक याचा अर्थ या उपविधी अनुसार लायसन धारण करणारी व्यक्ती असा आहे.

(च) लायसन प्राधिकारी याचा अर्थ आयुक्त किंवा अधिनियमाच्या

कलम ६९ अन्वये ज्याला या उपविधी अनुसार लायसन किंवा परवाना देण्यासाठीचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. असा कोणताही अन्य महानगरपालिका अधिकारी असा आहे.

(छ) मटण याचा अर्थ मानवी आहारासाठी योजलेले कोणत्याही पशु किंवा पक्ष्याचे मांस असा आहे.

(ज) दुकान म्हणजे कोणतीही इमारत, छपरी किंवा खोली, कोणतीही बंदिस्त जागा ज्याची व्याख्या केलेली आहे, नाही, जिचे वाटप करण्यात आलेले आहे किंवा मटण विक्रीच्या कारणाकरीता कोणत्याही व्यक्तीस देण्यात आलेली आहे.

(झ) परवाना याचा अर्थ या उपविधीखाली महानगरपालिकेच्या बाजारात विक्रेय वस्तुंसाठी मंजुर करण्यात आलेला दैनिक परवाना असा आहे.

(ज) गाळा यात कोणतीही वस्तु विकण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला नेमुन देण्यात येईल असे बाजारातील कोणतेही स्थान उदा. इमारत, दुकान, छपरी किंवा खोली किंवा कोणतीही जागा, कोंडवाडा किंवा जागा किंवा बंदिस्त किंवा खुली जागा मग तिची व्याख्या केलेली असो अगर नसा याचा समावेश असेल.

२) त्या उपविधीमध्ये वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्द, वाक्यप्रयोग किंवा शब्दप्रयोग यांना अधिनियमात जो अर्थ नेमुन दिला असेल तोच अर्थ असेल.

## ३) बाजारपेठा व कत्तलखाना यांवर नियंत्रण

शहरातील प्रत्येक बाजार व कत्तलखाना, आयुक्तांच्या नियंत्रणाच्या अधिनतेने, याबाबत आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आला असेल अशा कोणत्याही महानगरपालिका अधिका-यांच्या निरीक्षणाखाली व सर्वसाधारण देखरेखीखाली असेल.

## ४) खाटकाचा व्यवसाय करण्यासाठी लायसन

अ) आयुक्त, महानगरपालिका किंवा खाजगी कत्तलखान्याची क्षमता किंवा शहरातील अन्य कोणतेही योग्य ठिकाण लक्षात घेऊन, महानगरपालिका किंवा खाजगी कत्तलखान्यांमध्ये किंवा अशा अन्य

कोणत्याही मोकळया ठिकाणी खाटकाचा व्यवसाय करण्यासाठी, प्राण्यांची कत्तल करण्यासाठी दरवर्षी किती लायसने मंजुर करावयाची ते ठरवील. आणि त्यासाठी कोणत्याही दोन स्थानिक वर्तमानपत्रात जाहिराती प्रसिध्द करून अर्ज मागवील आणि अशा जाहिरातींची एक प्रत महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात आणि सर्व महानगरपालिका, विभागिय कार्यालय कत्तलखान्यांमध्ये चिकटवील.

आ) शहरामध्ये खाटकाचा व्यवसाय करण्याची इच्छा असणारी कोणतीही व्यक्ती, आयुक्तांनी विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात उपरोक्त खंड (१) अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातींमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वेळेत अशा लायसनसाठी अर्ज सादर करील.

इ) (क) जर वरील खंड (अ) अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातींला प्रतिसाद म्हणून सर्व बाबतीत वैध असलेल्या अर्जाची संख्या हि मंजुर करावयाच्या लायसनांच्या संख्येइतकीच किंवा त्याहून कमी असेल तर, प्रत्येक अर्जदारास या तरतुदींच्या किंवा या उपविधींच्या अधीनतेने लायसन मंजुर करण्यात येईल.

(ख) जर अशा प्रकारे प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या हि देण्यात यावयाच्या लायसनांच्या संख्येपेक्षा अधिक असेल तर लिलावाद्वारे लायसन देण्याचा हक्क असेल आणि यात अर्जदाराला केवळ बोली बोलता येईल, मात्र बोली त्यावेळी विहीत केलेल्या लायसन फी पेक्षा कमी नसेल.

(ग) कोणतेही कारण न देता लिलाव रद्द करण्याचा हक्क लायसन अधिका-याकडे राखून ठेवण्यात आला आहे.

(घ) " बकरी ईद " निमित्त आयुक्त तात्पुरत्या कत्तलखान्यास, आयुक्तास योग्य वाटेल इतक्या तात्पुरत्या कत्तलखान्यास अनामत शुल्क, परवाना शुल्क वसुल करून परवानगी/लायसन देईल.

**७) मोकळया जागेच्या वापरासाठी दैनिक परवाना देणेः-**

१) लायसन प्राधिकारी, बाजारातील मोकळी जागा अशा बाजारात

विक्रीसाठी परवानगी असलेल्या वस्तुंच्या विक्रीसाठी दैनिक तत्वावर भाडयाने देऊ शकेल.

२) कोणत्याही व्यक्तीला अशा मोकळया जागेचा दैनिक तत्वावर उपयोग करावयाची इच्छा असेल तर दैनिक फी प्रदान केल्यावर तिला लायसन प्राधिका-याकडून दैनिक परवाना मिळेल.

## ८) खाजगी बाजार किंवा खाजगी कत्तलखाना सुरू करण्यासाठी व चालविण्यासाठी परवानगी.

अ) अधिनियमाच्या कलम ३३१ अन्वये शहरात खाजगी बाजार किंवा खाजगी कत्तलखाना सुरू करण्यासाठी आयुक्तांची मंजुरी मिळालेल्या प्रत्येक व्यक्तीला आयुक्तांकडून विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात खाजगी बाजार किंवा खाजगी कत्तलखाना सुरू करण्यासाठी लेखी परवानगीकरीता अर्ज करता येईल.

आ) असे आवेदन मिळाल्यावर, आयुक्त खाजगी बाजार किंवा खाजगी कत्तलखाना सुरू करण्यासाठी अर्जदाराने अनुपालन करावयाच्या गरजांसाठी अर्जदाराशी संपर्क साधेल.

इ) सर्व गरजांची यथोचितरित्या पुर्तता करण्यात आली आहे आणि असा खाजगी बाजार किंवा खाजगी कत्तलखाना सुरू करण्यास हरकत नाही याबाबत खात्री पटल्यावर लायसन प्राधिकारी, लायसन फी प्रदान केल्यानंतर खाजगी बाजार किंवा सद्यस्थिती खाजगी कत्तलखाना सुरू करण्यासाठी लायसन देईल.

ई) खंड (इ) ची तरतुद बकरी ईद सणानिमित्त परवानगी देणेत येणा-या खाजगी कत्तलखान्यांही लागु राहील.

## ९) विद्यमान खाजगी बाजार व खाजगी कत्तलखाने यांना लायसन देणे.

हया उपविधी च्या लगत खाजगी बाजार किंवा खाजगी कत्तलखाना चालवित असलेल्या प्रत्येक व्यक्तीला आयुक्ताने विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात या उपविधीच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत असा खाजगी बाजार किंवा खाजगी कत्तलखाना चालविण्याकरीता लायसन मिळण्यासाठी अनुज्ञापक प्राधिका-याकडे अर्ज

करता येईल. अशा अर्जदारास उपविधी ९ (२) आणि (३) च्या तरतुदी लागु असतील.

## १०) लायसनचा कालावधी.

या उपविधी अन्वये देण्यात आलेले लायसन एक वर्षाकरीता किंवा ३१ डिसेंबर रोजी संपणा-या वर्षाच्या भागाकरीता ग्राहय असेल आणि अशा प्रत्येक लायसन किंवा लेखी परवानगी करीता महानगरपालिकेच्या मंजुरीने आयुक्तांकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल, अशा दराने फी आकारता येईल.

## ११) प्रतिभूति ठेवी.

लायसन फी शिवाय अर्जदाराला लायसनच्या शर्तीचे आणि अशा लायसनचे नियमन करणारे अधिनियम, नियम व उपविधी किंवा स्थायी आदेश यांच्या अन्य तरतुदींच्या विश्वासपुर्ण अनुपालन करण्याकरीता प्रतिभूति ठेव विना व्याजी देणेसुध्दा आवश्यक असेल.

## १२) लायसनचे नुतनीकरण

१) या उपविधी अन्वये देण्यात आलेल्या लायसनच्या नुतनीकरणासाठी लायसनच्या समाप्तीच्या दिनांकापुर्वी आवश्यक त्या लायसन फी सह लायसन प्राधिका-याकडे अर्ज करण्यात येईल. जर लायसनच्या नुतनीकरणासाठी लायसन फी सह ३१ डिसेंबर पुर्वी अर्ज करण्यात आला नाही, तर दरमहा किंवा महिन्याच्या काही भागाकरीता रू.५०/- इतके विलंब शुल्क १ जानेवारी पासून आकारले जाईल आणि जर लायसन फी सह लायसनच्या नुतनीकरणासाठी असा अर्ज ३० जुन पुर्वी करण्यात आला नाही तर लायसन रद्द झाले असे समजण्यात येईल आणि लायसन धारकाला नवीन लायसनसाठी अर्ज करता येईल.

२) जर अशा लायसनचे नियमन करणा-या अधिनियमच्या, नियमांच्या, उपविधीच्या किंवा स्थायी आदेशांच्या तरतुदींचा अर्जदाराने भंग केला नाही याबाबतीत लायसन अधिका-यांची जर खात्री पटली तर लायसन प्राधिकारी लायसनचे नवीकरण करेल.

## १३) या उपविधी अन्वये लायसन देणे किंवा त्याचे नवीकरण करणे यावरील निर्बंध

का) अर्जदारावर नैतिक अधोगतीच्या अपराधाकरीता कोणत्याही न्यायालयांकडून दोष सिध्द झालेला असेल आणि अशा दोषसिध्दीनंतर तीन वर्षाचा काळ लोटलेला नसले तर किंवा -

ख) अर्जदाराकडे महानगरपालिकेकडील कोणत्याही प्रकारची थकबाकी देय असेल तर या उपविधी अन्वये त्याला लायसन देण्यात येणार नाही किंवा त्याचे नवीकरण करण्यात येणार नाही.

## १४) लायसनमध्ये घालून दिलेले निर्बंध व शर्ती यांचे लायसनधारकाने पालन करणे

या उपविधीनुसार लायसन धारण करणारा प्रत्येक लायसनधारक लायसनमध्ये नमुद केलेल्या शर्ती व निर्बंध यांचे पालन करेल.

## १५) लायसन धारण करणा-या लायसनधारकाची कर्तव्ये

१) महानगरपालिका बाजारात व्यापार करण्यासाठी किंवा कत्तलखाना चालविण्यासाठी लायसन धारण करणारा प्रत्येक लायसनधारक -

क) त्याचे लायसन लायसेन्सच्या जागेत नजरेत भरेल अशा ठिकाणी प्रदर्शित करील.

ख) त्याचे दुकान किंवा बसण्याची जागा नेहमीच स्वच्छ ठेवील.

ग) लायसन प्राधिका-याला किंवा त्याबाबत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणताही महानगरपालिका अधिका-याला त्याचा गाळा किंवा बसण्याचे ठिकाण कोणत्याही वेळी, निरीक्षण करण्यासाठी उपलब्ध करून देईल.

घ) व्यक्तिशः किंवा त्याला योग्य वाटेल असा सहाय्यक, अभिकर्ते किंवा सेवक यांच्या मार्फत लायसन प्राधिका-याच्या मान्यतेने, त्याच्या वतीने व्यवसाय, धंदा चालविण्यासाठी प्राधिकृत करू शकेल आणि त्यांच्या नावांची बाजार निरीक्षकाने ठेवावयाच्या बाजार नोंदवहीमध्ये नोंदणी करू शकेल. मात्र असे सहाय्यक,

अभिकर्ते किंवा सेवक लायसनधारकांवरील सर्व बंधनकारक अटींचे पालन करतील.

ड) लायसनमध्ये स्पष्टपणे विनिर्दिष्ट केलेल्या वस्तुपेक्षा कोणतीही इतर वस्तु विक्रीसाठी मांडणार नाही.

च) कोणताही केरकचरा, त्वचा, पिसे किंवा शिळे मांस बाजारात आणणार नाही ते इतस्ततः फेकणार नाही.

छ) महानगरपालिकेने बाजारात पुरवठा केलेले पाणी वाया घालवणार नाही किंवा त्याचा गैरवापर करणार नाही.

ज) बाजारात लिलावाने त्या प्रयोजनासाठी आरक्षित केलेल्या विनिर्दिष्ट जागांशिवाय अन्य जागी कोणतीही विक्री करणार नाही.

झ) ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी कोणतीही घंटा, ध्वनिक्षेपक किंवा मोठा आवाज निर्माण करणारी वाद्ये यांचा वापर करणार नाही.

ज) शिवीगाळ करणार नाही किंवा क्षोभक भाषा वापरणार नाही.

ट) सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेशिवाय किंवा मंजुरीशिवाय दुकानावर किंवा दुकानाच्या सभोवती कोणतेही बांधकाम उभारणार नाही किंवा दुकानात कोणतीही भर घालणार नाही किंवा त्यात फेरफार करणार नाही.

ठ) त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्याने प्राधिकृत केलेली नाहीत अशी कोणतीही वजने किंवा मापे वापरणार नाही.

ढ) लायसनधारक जनावरांची कत्तल मनपा अधिकृत कत्तलखान्यातच करील.

२) वरील उपविधी (१) च्या तरतुदी दैनिक परवानाधारकांना सुध्दा लागु होतील.

## १६) मटणाच्या गाळयाचा साठवणुकीची जागा म्हणून उपयोग न करणे

मटणाच्या दुकानाच्या लायसनधारकाला त्याच गाळयाचा लायसन प्राधिका-याच्या लेखी पुर्व परवानगीशिवाय, गोदाम म्हणून किंवा मांस

साठवणुकीचे ठिकाण म्हणून तसेच घाऊक विक्रीसाठीचे ठिकाण म्हणून वापर करता येणार नाही.

**१८) लायसन रद्द करणे - लायसन प्राधिका-यास**

एक) एखाद्या लायसनधारकाने चुकीचे अभिवेदन करून किंवा लबाडीने लायसन मिळविले आहे किंवा

दोन) लायसन ज्या निर्बंधाच्या व शर्तींच्या अधीनतेने दिले होते त्यापैकी कोणत्याही निर्बंधाचे व शर्तीचे लायसनधारकाने उल्लंघन केले आहे किंवा त्याच्या पालनाबाबत टाळाटाळ केली आहे किंवा

तीन) अशा लायसनचे नियमन करणारे अधिनियम, नियम, उपविधी किंवा स्थायी आदेश यांच्या कोणत्याही तरतुदींचे लायसनधारकाने उल्लंघन केले आहे किंवा

चार) तसे करण्यास भाग पाडणारी इतर कोणतीही कारणे असे मानण्यास संयुक्तिक कारण वाटल्यास लायसन प्राधिका-याला असे लायसन रद्द करता येईल.

२) लायसन प्राधिकारी असे लायसन रद्द करण्यापुर्वी लायसन रद्द का करण्यात येऊ नये, याबाबत तो विनिर्दिष्ट करील अशा कालावधीत लेखी कारण दाखविण्यास लायसनधारकाला फर्मावील.

३) लायसन प्राधिका-याकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीत कारण दाखविण्यास लायसनधारकाने कसूर केली असेल किंवा लायसनधारकाने दाखविलेल्या कारणाबाबत लायसन प्राधिका-याचे समाधान झाले नसेल तर लायसनधारकाने दिलेले दुकानाचे भाडे जप्त केल्याचे समजण्यात येईल.

४) या उपविधी अन्वये लायसन रद्द केल्यावर लायसनधारकाने दिलेली लायसन प्रत किंवा दुकानाचे भाडे समपहृत केल्याचे समजण्यात येईल.

५) या उपविधी अन्वये लायसन रद्द करण्यात आल्यावर, लायसनधारकाकडे वैध लायसन नसल्याचे मानण्यात येईल

आणि लायसनला लागु असलेले अधिनियम, उपविधी, नियम व स्थायी आदेश या अन्वये तरतुद केल्याप्रमाणे आवश्यक ती कारवाई केली जाण्यास तो स्वतः पात्र असेल.

६) लायसन रद्द केल्यावर, लायसनधारकाने दिलेली प्रतिभूती तेच समपहृत केल्याचे समजण्यात येईल.

## २०) प्राण्यांच्या कत्तलीवरील निर्बंध

१) अंमलात असलेल्या प्रस्तुत कायद्यांच्या तरतुदींच्या अधीन राहून, खाटकाच्या व्यापारासाठी लायसन धारण करणारा लायसनधारक कोणत्याही नगरपालिकेच्या कत्तलखान्यात किंवा खाजगी कत्तलखान्यात किंवा कत्तल करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अन्य ठिकाणी यात याखाली नमुद केलेल्या कोणत्याही प्रकारच्या प्राण्यांची कत्तल करणार नाही.

एक) शेतीकामासाठी, जुपणीसाठी किंवा पैदाशीच्या प्रयोजनासाठी ज्यांचा उपयोग केला जातो किंवा ज्यांचा उपयोग होण्याची शक्यता आहे असे वळु, बैल.

दोन) दुध मिळविण्याच्या प्रयोजनासाठी किंवा पैदाशीसाठी जे उपयोगी आहेत किंवा ज्यांचा उपयोग होण्याची शक्यता आहे अश म्हशी व म्हशींच्या पारडी.

तीन) कुठलीही व्यक्ती कोणत्याही ठिकाणी कोणत्याही वयाची गाय कत्तल करणार नाही, करण्यास कारणीभूत आणि साहाय्य करणार नाही.

२) लायसनधारक कोणत्याही प्राण्याची कत्तल करण्यापुर्वी कातडी व चरबीपासून मांस सुटे करण्याच्या प्रयोजनासाठी त्या प्राण्याला इजा पोहचविणार नाही किंवा खाजगी कत्तलखान्यात किंवा इतर कोणत्याही प्राधिकृत ठिकाणी कोणत्याही प्राण्याला कत्तलीसाठी आणणारी प्रत्येक व्यक्ती त्या प्राण्याची स्वच्छता राखील आणि -

एक) प्राणी कत्तलखान्याच्या रक्षकाच्या ताब्यात आहेत आणि ते एकमेकांपासून वेगळे रहावेत यासाठी त्यांना दोरखंडानी सुरक्षित बांधले आहे आणि

दोन) प्राण्यांना बारा तास इतकी विश्रांती दिलेली आहे आणि कत्तलीसाठी नेण्यापुर्वी त्यांना खाण्यास योग्य खाद्य व पिण्यास पाणी दिलेले आहे.

**२१) कत्तलखान्यात मुलांना प्रवेश नसणे**

दहा वर्षाखालील वयाच्या मुलांना कोणत्याही प्रयोजनासाठी कोणत्याही महानगरपालिकेच्या कत्तलखान्यात किंवा खाजगी कत्तलखान्यात प्रवेश देण्यात येणार नाही.

**२२) लायसनधारकाने भागीदार इत्यादी न बनविणे**

लायसनधारक, लायसन प्राधिका-यांची परवानगी घेतल्याखेरीज त्याच्या धंद्यातील भागीदार म्हणून किंवा त्याच्या कामधंद्यावर देखरेख ठेवणारा कारभारी म्हणून कोणत्याही व्यक्तीला ठेवणार नाही.

**२३) लायसनधारकाने कोणताही अन्नपदार्थ इत्यादी तयार करू नये, शिजवू नये किंवा त्याची विक्री करू नये.**

लायसनधारक किंवा इतर कोणतीही व्यक्ती कत्तलखान्याच्या परिवास्तूमध्ये मानवी आहाराच्या उद्देशाने कोणताही अन्नपदार्थ तयार करणार नाही, शिजवणार नाही किंवा त्याची विक्री करणार नाही.

**२४) कत्तलखाना बंद ठेवणे**

आयुक्त किंवा त्याने नियुक्त केलेला कोणताही अधिकारी, शासकीय किंवा कोणत्याही सामाजिक किंवा धार्मिक कारणामुळे आवश्यकता भासल्यास, संबंधीतांना लेखी नोटीस देऊन, कत्तलखाना, मटणांची दुकाने वेळोवेळी बंद ठेवील.

**२५) कत्तलखान्याच्या वेळांमध्ये बदल करणे**

पुर्वसुचना देऊन आयुक्ताला किंवा त्याने नियुक्त केलेल्या अधिका-याला कत्तलखान्याच्या वेळांमध्ये बदल करता येतील.

**२६) कत्तलखान्यात किंवा त्याच्या जवळपास पाळीव प्राणी न बांधणे.**

..२२..

लायसनधारकाला त्याच्या दुकानाजवळ किंवा कत्तलखान्याच्या जवळपास कत्तलीस आणलेल्या प्राण्याखेरीज कोणताही पाळीव प्राणी बांधण्यास परवानगी देण्यात येणार नाही

## नाशिक शहर (नाशिक महानगरपालिका हद्दीतील गोठवलेले मटन व गोठवलेली मांसळी यांच्य साठयाचे व विक्रीचे विनियमन) उपविधी २००८

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) यांची कलमे ३८१ (अ) व ३८६ आणि कलम ४५८ चे खंड (२६) व (४८) आणि अनुसुची ड चे प्रकरण पंधरा याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन नाशिक शहराच्या महानगरपालिकेकडुन करण्यात आलेले पुढील उपविधी, उक्त अधिनियमाच्या कलम ४६० द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे पुर्व प्रसिध्दीनंतर आणि कलम ४६१ अन्वये महाराष्ट्र शासनाने कायम केल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम ४६२ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात याद्वारे अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात येत आहेत.-

१) <u>संक्षिप्त नांव</u> -

या उपविधींना 'नाशिक' शहर (नाशिक महानगरपालिका हद्दीतील गोठवलेले मटन व गोठवलेली मासळी यांच्या साठयाचे व विक्रीचे विनियमन ) ' उपविधी '२००८ असे म्हणावे..

**२) व्याख्या**

१) या उपविधीत विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकुल नसेल तर -

(क) 'आयुक्त' याचा अर्थ कलम ३६ अन्वये नियुक्त केलेला शहराचा, महानगरपालिका आयुक्त असा आहे आणि त्यामध्ये कलम २९ अन्वये नियुक्त केलेल्या कार्यार्थ आयुक्तांचा समावेश होतो.

(ख) ' अधिनियम' याचा अर्थ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) असा आहे.

(ग) 'शहर' याचा अर्थ अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट कलम (२) अन्वये घटित करण्यात आलेले नाशिक शहर असा आहे.

(ड) 'लायसन' याचा अर्थ बाहेरील मटणाचे दुकान किंवा बाहेरील मासळीचे दुकान चालविण्यासाठीचे लायसन असा आहे.

(च) ‘लायसन प्राधिकारी‘ याचा अर्थ या उपविधीतील लायसन धारण करणारी व्यक्ती असा आहे.

(छ) ‘मटन‘ याचा अर्थ मानवी आहारासाठी योजलेला कोणताही पशु किंवा पक्षी यांचे मांस असा आहे

(ज) ‘गोठवलेले मटन किंवा गोठवलेली मासळी‘ याचा अर्थ मानवी आहारासाठी योजलेले व विक्रीच्या वेळी मानवी आहारासाठी हितावह व योग्य राहील अशा स्थितीत प्रशीतकामध्ये ठेवलेले सीलबंद पाकिटातील किंवा पेटयांतील अनुक्रमे मटण व मासळी, सुकट, बोंबील, सुकी मासळी, खेकडे झिंगे इ. असा आहे.

२) या उपविधिमध्ये वापरण्यात आलेले परंतु यात वर व्याख्या न केलेले शब्द व शब्द प्रयोग यांना अधिनियमात जो अर्थ नेमुन दिलेला असेल तोच अर्थ असेल.

**३) मटणाचे दुकान व मासळींचे दुकान यांचे नियंत्रण आणि देखरेख.**

शहराच्या हद्दीतील सीलबंद पाकिटातील किंवा पेटयांतील गोठवलेले मटण व गोठवलेली मासळी विकणारे प्रत्येक दुकान, आयुक्तांच्या नियंत्रणाच्या अधिनतेने महानगरपालिकेच्या बाजार निरीक्षकाच्या किंवा याबाबत आयुक्तांकडुन प्राधिकृत करण्यात आलेल्या इतर कोणत्याही महानगरपालिका अधिका-याच्या निरीक्षणाखाली व सर्वसाधारण देखरेखीखाली असेल.

**४)लायसन्ससाठी अर्ज.**

१) शहराच्या हद्दीच्या आत महानगरपालिका बाजाराबाहेर सीलबंद पाकिटातील किंवा पेटयातील गोठवलेले मटण आणि किंवा गोठवलेली मासळी यांची विक्री करण्याचा उद्देश असणारी प्रत्येक व्यक्ती, लायसन्स प्राधिका-याकडुन निश्चित करण्यात येईल. अशा ना परतावा आदेशिका फीसह लायसन प्राधिक-याकडुन विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा नमुन्यात, आयुक्ताला, लायसन देण्यासाठी लेखी अर्ज सादर करेल.

२) अर्जाच्या छाननीनंतर, लायसन प्राधिकारी एकतर लायसन देण्यास नकार देईल किंवा आयुक्त विनिर्दिष्ट करु शकेल अशा आवश्यक

गोष्टी व शर्ती यांच्या अधीन राहुन आयुक्तांकडुन निर्धारीत करण्यात येईल अशी लायसन फी आणि प्रतिभुती ठेवी बिन व्याजी यांच्या प्रदानानंतर, वार्षिक लायसन देणे किंवा लायसन देण्यास नकार देणे या दोहोंपैकी एक करु शकेल.

परंतु जेव्हा लायसन नाकारण्यात येते तेव्हा अर्जदाराला कारणे कळविण्यात येतील.

३) शासनाकडुन प्राधिकृत करण्यात येतील अशा कंपन्याकडुन मोहोरबंद केलेले व आवेष्टित केलेले गोठवलेले मांस आणि किंवा गोठवलेली मासळी यांच्या विक्रीसाठी लायसन प्राधिका-याकडुन लायसन देण्यात येईल.

४) या उपविधीतील प्रत्येक लायसन विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नमुन्यांत लायसन प्राधिका-याकडुन लायसन देण्यात येईल.

**५) लायसन देण्यावरील निर्बंध - जर**

(१) अर्जदार सज्ञान वयाचा होत नसेल .

(२) गोठवलेले मांस आणि/ किंवा गोठवलेली मासळी यांच्या विक्रीसाठी निवडलेली जागा त्यावेळी अंमलात असलेल्या विकास नियंत्रण उपविधी नुसार अनुरुप क्षेत्रात नसेल.

(३) अर्जदाराकडे कोणत्याही महानगरपालिकेच्या देय रकमांची थकबाकी असेल तर गोठवलेले मटण आणि/ किंवा गोठवलेली मासळी यांच्या विक्रीसाठी लायसन्स देणेत येणार नाही.

**६) लायसनचा कालावधी**

या उपविधीनुसार दिलेले प्रत्येक लायसन ज्या वर्षात ते देण्यात आले आहे, त्या वर्षाच्या ३१ डिसेंबर पर्यंतच्या एका वर्षाकरीता किंवा त्यांच्या काही भागाकरीता किंवा पुढील वर्षाच्या ३१ डिसेंबर पर्यंत ग्राहय असेल.

**७) प्रतिभुती ठेवी-**

अर्जदाराला लायसन फी शिवाय लायसनच्या शर्ती आणि अशा लायसनचे विनियमन करणारा अधिनियम, नियम व उपविधी किंवा

स्थायी आदेश यांच्या अन्य तरतुदी यांचे निष्ठापुर्वक अनुपालन करण्याकरीता मा. आयुक्त, मनपा, ठरवेल अशी प्रतिभुती ठेव बिन व्यजी देखील प्रदान करणे आवश्यक असेल.

## ८) लायसनचे नुतनीकरण

(१) अशा लायसनच्या समाप्तीच्या दिनांकापुर्वी लायसन फी सह लायसनच्या नवीकरणाचा अर्ज लायसन प्राधिका-याकडे करण्यात येईल.

(२) लायसनच्या नवीकरणासाठी अर्ज मिळाल्यावर लायसन प्राधिकारी जर लायसनच्या किंवा उपविधीच्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन झालेले नसेल तर, लायसनचे नवीकरण करेल, लायसन प्राधिकारी, जर त्याला वाटले की लायसनचे नवीकरण करु नये तर त्याचे नवीकरण करणार नाही आणि त्याची कारणे लायसन धारकाला कळवील.

(३) जर लायसन फी सह लायसनच्या नवीकरणाकरीता ३१ डिसेंबर पुर्वी अर्ज केलेला नसेल तर १ जानेवारी पासुन प्रत्येक महिन्याकरीता किंवा त्याच्या काही भागाकरीता ५०/- इतके विलंब शुल्क आकारण्यात येईल आणि जर लायसन फी सह लायसनच्या नवीकरणासाठीचा असा अर्ज ३० जुन पुर्वी केला नाही, तर लायसनचे नवीकरण करण्यात येणार नाही आणि लायसनधारकाला नवीन लायसन करीता अर्ज करावा लागेल.

## ९) लायसन निलंबन व लायसन रद्द करणे.

(१) लायसन प्राधिका-यास

(क) कोणत्याही लायसन धारकाने लबाडीने लायसन मिळविले आहे किंवा

(ख) लायसन ज्या निर्बधांच्या व शर्तीच्या अधीनतेने दिले होते, त्यापैकी कोणत्याही निर्बंधाचे व शर्तीचे लायसनधारकाने उल्लंघन केले आहे किंवा त्याच्या पालनाबाबत टाळाटाळ केली आहे किंवा

(ग) गोठवलेले मटन किंवा गोठवलेली मासळी यांची विक्री करण्यास लागु असणारा अधिनियम, नियम किंवा उपविधी यांच्या तरतुदीचे कोणत्याही लायसन धारकाकडुन उल्लंघन केले आहे किंवा.

(घ) लायसनधारकास गोठवलेले मटन आणि/ किंवा गोठवलेली मांसळी यांची विक्री बंद करण्यास भाग पाडणारी अन्य कारणे आहेत.

(२) लायसन निलंबित किंवा रद्द करण्याचा आदेश देण्यापुर्वी लायसन प्राधिकारी विनार्दिष्ट कालावधीसाठी लायसन निलंबित का करु नये किंवा यथास्थित रद्द का करु नये यासाठी कारण दाखविण्यास त्याला/ तिला उक्त नोटीसीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा वेळी बोलावुन घेईल.

(३) जर लायसनधारक लायसन प्राधिका-याने विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत कारण दाखविण्यास अपयशी ठरला किंवा त्याने दाखविलेल्या कारणाने लायसन प्राधिका-याचे समाधान झाले नाही, तर लायसन प्राधिकारी विनिर्दिष्ट कालावधीसाठी लायसन निलंबित करु शकेल किंवा यथास्थित सर्वस्वी लायसन रद्द करु शकेल.

(४) लायसनच्या निलबंनानंतर किंवा ते रद्द झाल्यानंतर जर व्यवसाय चालविला जात असेल तर तो व्यवसाय लायसनशिवाय चालविला जात असल्याचे मानण्यात येईल आणि अगोदरच दिलेली लायसन फी किंवा प्रतिभुती ठेव बिन व्याजी समहृत होईल.

## १०) निरसन व त्यावृत्ती

हे उपविधी अंमलात येण्याच्या लगतपुर्वी अंमलात असलेले उपविधी आणि नियम हे उपविधी अंमलात येण्याच्या दिनांकापासुन आणि तेव्हाच निरसित होतील.

**प्रपत्र ब**

**नाशिक महानगरपालिका,नाशिक**

**खाटीकाचा धंदा चालविण्याकरीता अनुज्ञप्ती**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, (मुंबई एकोणसाठ, १९४९ चे) मधील कलम ३८१ ला अनुसरून आणि उपविधी ४ नाशिक शहराचे (खाटीक उद्योगाचे आणि बाजाराचे आणि कत्तलखान्याचे विनियमन) उपविधी १९९८ हि अनुज्ञप्ती देण्यात येत आहे. श्री/श्रीमती/कुमारी ----------------------------------- यांना ज्यांचा फोटो इथे चिकटविण्यात आला आहे, त्यांना यापुढे खाटीक धंदा चालविण्याकरीता ------------------------------------ या ठिकाणी नाशिक शहरात ३१ डिसेंबर २०० रोजी संपणा-या कालावधीकरीता आणि अशा अनुज्ञप्तीच्या समाप्तीनंतर अनुज्ञप्ती धारकास कोणतीही कृती करण्याचे थांबवावे आणि बंद करावे लागेल, सदर दिनांकापुर्वी अनुज्ञप्तीच्या नुतनीकरणाकरीता अर्ज करावा लागेल.

हि अनुज्ञप्ती खालील निर्बंध आणि शर्तींच्या अधिन राहील प्रामुख्यानेः-

१) अनुज्ञप्तीधारकाने त्याला देण्यात आलेल्या अनुज्ञप्तीमध्ये नमुद केलेल्या जागे व्यतिरिक्त अन्य कोणत्याही ठिकाणी धंदा करता येणार नाही.

२) अनुज्ञप्तीधारक ------------------- याशिवाय कोणत्याही जनावरांची कत्तल करणार नाही. (या ठिकाणी अनुज्ञप्तीखाली कत्तलीकरीता परवानगी मिळालेल्या जनावरांचे प्रकार लिहावेत)

३) अनुज्ञप्ती प्राधिकारी किंवा इतर पालिका अधिकारी या कारणाकरीता विनिर्दिष्ट केलेला आहे त्यास त्याने अनुज्ञप्तीधारकाकडे तपासणीकरीता कोणत्याही वेळी अनुज्ञप्तीची मागणी केल्यास त्याला/तिला दाखववावी लागेल.

४) अनुज्ञप्तीधारक त्याचा धंदा सर्व वेळ सुव्यवस्थित आणि योग्य पध्दतीने चालवील. अनुज्ञप्ती प्राधिका-याला समाधानकारक वाटेल अशा रितीने आणि त्याचप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (मुंबई ५९, १९४९ चे) मधील तरतुद आणि शहराचे (खाटीक उद्योगाचे आणि बाजाराचे आणि कत्तलखान्याचे विनियमन उपविधीस) स्थायी आदेश १९९६ पालन करतील.

५) अनुज्ञप्तीधारक अनुज्ञप्ती प्राधिका-याला आणि निरीक्षकाकडे ठेवलेल्या बाजार खात्याच्या नोंदवहीत पत्याच्या सहाय्यकाची/कर्मचा-यांची नावे नोंदणीकरीता सूचना देईल. या अनुज्ञप्तीच्या शर्तींचे आणि या बाबतीतील सर्व उपविधीतील तरतुदींचे पालन असे सहाय्यक/कर्मचारी करतील.

६) अनुज्ञप्ती प्राधिकारी ज्या व्यक्तीची बाजारातील उपस्थिती अनिष्ट आहे असे गृहित धरेल अशा कोणत्याही व्यक्तीस अनुज्ञप्तीधारक नोकरीस ठेवणार नाही व त्याची कारणे लेखी असतील.

७) महानगरपालिकेच्या कत्तलखान्यात चोरीमुळे, आगीमुळे, पाण्यामुळे किंवा इतर कोणत्याही अपघाती किंवा त्याऐवजी कारणामुळे अनुज्ञप्तीधारकाच्या वस्तूंचे नुकसान किंवा त्याचा तोटा झाल्यास जबाबदार राहणार नाही.

८) आगीमुळे, पाण्यामुळे किंवा अशा इतर कारणामुळे अनुज्ञप्तीधारकाच्या हयगयीमुळे किंवा काळजी न घेतल्यामुळे किंवा त्याच्या कोणत्याही कर्मचा-यामुळे पालिका मालमत्तेची हानी झाल्यास अनुज्ञप्तीधारकाने हानी झालेली सर्व मालमत्ता संपूर्णपणे चांगल्या स्थितीत स्वतःचे खर्चाने भरून देणे आहे.

९) अनुज्ञप्ती अशा कोणत्याही वेळेस निलंबित करण्यात येईल तर अनुज्ञप्तीधारकाला जखमा किंवा कोणत्याही संसर्गजन्य किळसवाणा किंवा स्पर्शाने प्रादुर्भावाने होणारा रोग झाल्यास ज्यामुळे जो जनावरांच्या मांसाला स्पर्श करण्यास आक्षेपार्ह व्यक्ती आहे तोपर्यंत त्याची अनुज्ञप्ती निलंबित राहील जोपर्यंत तो अशा रोग किंवा दुखापतीपासून बरा होत नाही.

१०) अनुज्ञाप्तीधारक महापालिकेच्या हिताला अहितकारक ठरेल किंवा जे अहितकारक होणे संभवनीय आहे अशा कोणत्याही संपाशी त्याचा संबंध असणार नाही किंवा त्याचा भाग असणार नाही किंवा अशा कोणत्याही एकीकरणास तो दाखल होणार नाही किंवा आम जनतेला गैरसोईचे किंवा कोणतेही त्रासदायक ठरेल असे कारण करणार नाही.

११) अनुज्ञाप्तीधारक हा पाण्याचे पुर्ण भरलेल्या पात्राची तरतुद करील आणि कत्तलखान्यापासून किंवा कोणत्याही अनुज्ञाप्तीत जागेपासून बाहेरच्या जागी कातडयाची तसेच त्वचेची किंवा अशाच वस्तूचे वहन करण्याकरीता संपुर्णपणे झाकलेल्या गाडयांची तरतुद करेल. ज्यामुळे सार्वजनिक रस्त्यावरून जाणा-यांना कोणताही उपद्रव होणार नाही.

१२) अनुज्ञाप्तीधारक त्याच्या कत्तलखान्यात किंवा अनुज्ञाप्तीत जागेत जुगार खेळणार नाही किंवा त्याचा भाग असणार नाही किंवा जुगाराचे परवानगी देणार नाही. जुगार हया शब्द प्रयोगाचा अर्थ मुंबई जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ (मुंबई १८८७) मध्ये अभिप्रेत आहे.

१३) अनुज्ञाप्तीधारक निरीक्षकाकडे किंवा आयुक्तांनी वेळोवेळी नियुक्त केलेल्या इतर पालिका अधिका-याकडे आयुक्तांनी त्यावेळेकरीता ठरविलेले जनावरांची कत्तलखान्यात किंवा अनुज्ञाप्ती प्राप्त जागेत कत्तल करण्याकरीता दाखल करण्याकरीता असे शुल्क भरेल.

१४) जर अनुज्ञाप्ती प्राधिका-याला या बाबींची खात्री असल्यासः-

१) की कोणत्याही अनुज्ञाप्तीधारकाने दुर्वपदेशनाने किंवा लबाडीने अनुज्ञाप्ती प्राप्त केली आहे किंवा, २) की कोणत्याही निर्बंध आणि शर्ती मात्र ज्याकरीता अनुज्ञाप्ती देण्यात आलेली आहे, त्याचे उल्लंघन केलेले आहे किंवा अंमलात आणण्यात टाळाटाळ केलेली आहे किंवा ३) की अनुज्ञाप्तीकरीता असलेलया कोणत्याही अधिनियमातील, नियमातील उपविधीतील किंवा स्थायी आदेशातील तरतुदींचे विनियमन करतांना अनुज्ञाप्तीधारकाने उल्लंघन केले

किंवा ४) की असे करण्याकरीता भाग पाडणारे इतर कोणतेही कारण असल्यास, अनुज्ञप्ती प्राधिकारी, अनुज्ञप्ती रद्द करील.

१५) अशा समाप्त निलंबित किंवा रद्द झालेल्या अनुज्ञप्तीच्या बाबतीत अनुज्ञप्तीधारकाने धंदा त्वरीत बंद केला पाहिजे आणि जर त्याने या अनुज्ञप्तीखाली धंदा चालू ठेवल्यास तो अनुज्ञप्तीविना धंदा करीत आहे असे समजण्यात येईल.

१६) अनुज्ञप्ती निलंबित किंवा रद्द करण्याच्या कोणत्याही कारणाला बाधा येणार नाही किंवा परिणाम होणार नाही. कोणत्याही दाव्यात किंवा मागणीस जी आयुक्तांनी या खाली किंवा या ऐवजी केलेली आहे, त्यात आणि अनुज्ञप्ती निलंबित किंवा रद्द करणे प्रसंगी अनुज्ञप्तीधारकाने भरलेल्या कोणत्याही या रकमेचा कोणताही परतावा तो काय असेल तो अनुज्ञप्तीधारकाला परत मिळणार नाही.

१७) अ) अनुज्ञप्तीधारकाकडे खाटीकाच्या धंद्याची ती अनुज्ञप्ती आहे. त्याखाली तो कोणत्याही पालिका किंवा खाजगी कत्तलखान्यात किंवा इतर कोणत्याही कत्तलीच्या अनुज्ञप्ती प्राप्त जागेत कत्तल करणार नाही.

१) वळू, बैल, म्हैस ज्यांचा वापर करण्यात येत आहे किंवा ओझी ओढण्याकरीता किंवा पैदाशी वाढविण्याकरीता उपयुक्त आहे आणि अशी नर वासरे

२) गाई, म्हशी, कालवडी ज्या उपयुक्त आहेत आणि उपयुक्त ठरण्याची शक्यता आहे. दुध प्राप्त करण्याकरीता किंवा अशी मादी वासरे.

ब) अनुज्ञप्तीधारकाने, जनावरास कोणत्याही अमानुष पध्दतीने बाळगू नये, दुखवु नये, ज्यामुळे त्या जनावरांची कत्तल करण्यापुर्वी त्यांचे मांस, मेद कातडीपासून सैल होईल.

क) कोणतेही जनावर कत्तलीकरीता पालिका किंवा खाजगी कत्तलखान्यात किंवा कोणत्याही अनुज्ञप्ती प्राप्त जागेत आणणारी प्रत्येक व्यक्ती ते स्वच्छ राखील आणि खात्री करून घेईल की,

..३१..

१) जनावरे कत्तलखान्याच्या रखवालदाराच्या ताब्यात राहतील आणि ती एकमेकांना जखमी करण्यापासून बचाव करण्याकरीता ती दोरीने बांधली आहे आणि

२) जनावरांना कत्तलीत आणून सोडण्यापूर्वी बारा तासांची विश्रांती दिली गेली आहे आणि त्यांना सत्वयुक्त अन्न व पाणी दिले गेले आहे.

१८) अनुज्ञप्तीधारक या अनुज्ञप्तीखाली नमुद केलेल्या व्यतिरिक्त अन्य कोणताही धंदा पालिका किंवा खाजगी कत्तलखान्यात किंवा अनुज्ञप्ती जागेत करणार नाही.

अनुज्ञप्ती प्राधिकारी
नाशिक शहर महानगरपालिका, नाशिक

हि अनुसुची यापुढे नुतनीकरण केलेली आहे.

| अ.क्र. | पावती क्रमांक | तारीख | शुल्क रूपये | अनुज्ञप्ती वैध आहे पर्यंत | प्राधिका-याची सही |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**प्रपत्र क**

## नाशिक महानगरपालिका,नाशिक

### मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८२ खाली गोठविलेले मटण किंवा गोठविलेले मांसे विक्रीकरीता अनुज्ञाप्ती

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, (मुंबई एकोणसाठ, १९४९ चे) मधील कलम ३८२ ला अनुसरून आणि उपविधी १९९७ नाशिक शहराचे (गोठविलेले मटण आणि मांसे पालिका बाजाराबाहेर आणि नाशिक महानगरपालिका क्षेत्रात विक्री आणि साठवणीचे विनियमन)

उपविधी १९९७ हि अनुज्ञाप्ती देण्यात येत आहे. श्री/श्रीमती/कुमारी ---------------------------------- यांना ज्यांचा फोटो इथे चिकटविण्यात आला आहे, त्यांना यापुढे पालिका बाजाराबाहेर आणि नाशिक शहराच्या क्षेत्रात गोठविलेले मटण आणि गोठविलेले मांसे विक्रीकरीता ------------------------------------ या ठिकाणी नाशिक शहरात ३१ डिसेंबर २००    रोजी संपणा-या कालावधीकरीता आणि अशा अनुज्ञाप्तीच्या समाप्तीनंतर अनुज्ञाप्ती धारकास कोणतीही कृती करण्याचे थांबवावे आणि बंद करावे लागेल, सदर दिनांकापुर्वी अनुज्ञाप्तीच्या नुतनीकरणाकरीता अर्ज करावा लागेल.

हि अनुज्ञाप्ती खालील निर्बंध आणि शर्तींच्या अधिन राहील प्रामुख्यानेः-

### ५. निर्बध आणि शर्ती

१) हि अनुज्ञाप्ती कंपनी पॅकबंद, सीलबंद गोठविलेले मटण आणि गोठविलेले मासे सखोल थंडकात (डिप फ्रिज) ठेवील आणि खात्री करून घेईल. सखोल थंडक (डिप फ्रिज) दिवस रात्र योग्य स्थितीत कार्यरत आहे याची जर सखोल थंडक (डिप फ्रिज) नादुरूस्त झाल्यास अनुज्ञाप्तीधारक गोठविलेल्या मटणाची आणि गोठविलेल्या मासे पाकिटे, नादुरूस्त सखोल थंडकात (डिप फ्रिजमधून) काढून योग्य रितीने कार्यरत असलेल्या सखोल, थंडकात ठेवील. सखोल

थंडकाची (डिप फ्रिजची) तपासणी निरीक्षक आणि अनुज्ञाप्ती प्राधिका-याने या कारणाकरीता अधिकृत केलेल्या इतर पालिका अधिका-यास करण्याकरीता उघडा राहील.

२) अनुज्ञाप्तीधारक पुरवठादाराकडून प्राप्त झालेली गोठविलेल्या मटणाची आणि गोठविलेल्या मासे यांची मोहोरबंद पाकिटे किंवा पाकिटांची विक्री करेल आणि विक्री करतांना गोठविलेल्या मटणाची किंवा गोठविलेल्या मासे यांची मोहोरबंद पाकिटे किंवा पेटया उघडणार नाही.

३) अनुज्ञाप्तीधारक सर्व वेळी त्याच्या दुकानात अनुज्ञाप्ती लावेल.

४) अनुज्ञाप्तीधारक सर्व वेळी, पालिका आयुक्त आणि निरीक्षक किंवा निरीक्षकाच्या कोणत्याही हाताखालच्या मनुष्याला अनुज्ञाप्ती प्राधिका-याने तपासणीकरीता अधिकृत केलेले आहे, त्यास अनुज्ञाप्तीची मागणी केल्यावर अनुज्ञाप्ती दाखवील.

५) अनुज्ञाप्तीधारकाचे दुकान सर्व साधारणपणे पालिका आयुक्तांच्या ताब्यात या अनुज्ञाप्तीखाली धंदा चालविण्याच्या बाबतीत राहील आणि अनुज्ञाप्तीधारकाने सर्व वेळी पालिका आयुक्त आणि निरीक्षकांना किंवा त्यांच्या हाताखालील मनुष्याला दुकानाची पाहणी मोफत आणि सुविधायुक्त रितीने करून देण्याची आहे.

६) निरीक्षक किंवा इतर कोणताही पालिका अधिकारी ज्यास अनुज्ञाप्ती प्राधिका-याने या कारणाकरीता नेमलेले आहे त्यांना दुकानात आढळून आलेले मानवी आहाराकरीता असलेले गोठविलेले मटण आणि किंवा गोठविलेले मासे अहितकारक आहे तर ते नष्ट करतील किंवा नष्ट करण्यायोग्य असलेल्या जागी घेऊन जातील.

७) निरीक्षक किंवा अनुज्ञाप्ती प्राधिकारी यांनी अधिकृत केलेला कोणीही पालिका अधिकारी यांना मटण आणि किंवा मासे असलेली पाकीटे पेटी सखोल थंडकाबाहेर विक्रीकरीता ठेवलेली आढळून आल्यास ती काढून टाकण्यास आणि किंवा नष्ट करण्यास पात्र ठरतील.

८) हि अनुज्ञाप्ती हस्तांतरणीय नाही आणि अनुज्ञाप्तीधारक त्याच्या दुकानात सदर उद्योग किंवा ठेवलेले मटण आणि गोठविलेले मासे यांच्या विक्रीचा धंदा स्वतःच्या देखरेखीखाली आणि निर्देशनाखाली चालविल.

९) हि अनुज्ञाप्ती मिळाल्यानंतर ती चालु असलेल्या कालावधीपर्यंत वेळोवेळी अनुज्ञाप्तीधारक त्याच्या प्रत्येक कर्मचा-याची जे ज्याला त्या वेळेकरीता सहाय्य करतील अशांची नांवे निरीक्षकाकडे नोंदवतील. कोणीही कर्मचारी किंवा इतर कर्मचारी ज्याचे नांवे निरीक्षकाकडे नोंदविलेले नाही अशांना निरीक्षक किंवा अनुज्ञाप्ती प्राधिका-याने या कारणाकरीता अधिकृत केलेला इतर पालिका अधिकारी कोणत्याही वेळी तडकाफडकी काढून टाकील.

१०) निरीक्षकाने मनाई केली असलेले कोणत्याही कर्मचा-यास किंवा इतर व्यक्तीस ज्याची नियुक्ती या धंद्याच्या किंवा उद्योगाच्या ज्या अनुज्ञाप्तीखाली ते समाविष्ट आहेत, अशांस अनुज्ञाप्तीधारक त्याच्या दुकानातल्या नोकरीवरून तात्काळ काढून टाकील किंवा अशांना नोकरीत घेणार नाही.

११) कोणताही कर्मचारी किंवा इतर व्यक्ती ज्याचे नाव नोंदविलेले नाही किंवा ज्यांच्या नोकरीत मनाई करण्यात आलेली आहे त्याच्या कोणत्याही बहाण्यात जो काही असेल तो, अनुज्ञाप्ती धारकाने त्यास धंद्याच्या किंवा उद्योगाच्या सदर प्रयोजनार्थ किंवा गोठविलेले मटण किंवा गोठविलेले मांस विक्रीच्या संबंधात दुकानात प्रवेश करणेस मनाई केली पाहिजे.

१२) अनुज्ञाप्ती प्राधिकारी यांना सर्व बाबतीत समाधानकारक वाटेल अशा सुव्यवस्थित आणि योग्य रितीने आणि सर्व वेळी अनुज्ञाप्तीधारक त्याचे दुकान चालवील आणि सर्व वेळी त्याचे दुकान स्वच्छ आणि आरोग्यकारक स्थितीत ठेवील आणि सर्व वेळी मुंबई प्रांतिक महानगरपालिका तरतुदींचे आणि कोणत्याही संविधीमान्य बदलाचे आणि सर्व उपविधीचे नियमांचे विनियमांचे जे वेळोवेळी बदललेले असतील. गोठविलेले मांस आणि गोठविलेले मासे यांच्या विक्रीच्या संबंधित पालिका बाजाराच्या बाहेर नाशिक शहराच्या क्षेत्रात आणि अनुज्ञाप्ती प्राधिका-याच्या सर्व वाजवी आदेशाचे निरीक्षण करेल आणि तात्काळ पालन करेल.

१३) अनुज्ञाप्तीधारक महानगरपालिकेच्या हिताला अहितकारक ठरेल किंवा ते अहितकारक संभवनीय आहे अशा कोणत्याही संपाशी

त्याचा संबंध असणार नाही व त्याचा भाग असणार नाही किंवा अशा कोणत्याही एकीकरणात तो दाखल होणार नाही किंवा आम जनतेला गैरसोयीचे ठरेल असे किंवा कोणतेही त्रासदायक ठरेल असे कारण करणार नाही.

१४) अनुज्ञाप्तीधारकाने त्याच्या अनुज्ञाप्तीखाली त्याचे दुकान हस्तांतर केले किंवा भाडयाने दिले किंवा दुकानाची विभागणी केली किंवा त्याऐवजी त्याचा उद्योग किंवा गोठलेले मटण आणि किंवा गोठविलेले मांस विकण्याचा धंदा केला तर त्याची अनुज्ञाप्ती त्वरीत थांबविली जाईल व समाप्त होईल.

१५) प्रोव्हीजन स्टोअर्स अथवा मॉल मध्ये विक्रीसाठी ठेवण्यात आलेस त्यासाठी वेगळी शोकेस अथवा स्वंतत्र फ्रीज ठेवणे आवश्यक आहे व दर्शनी भागावर गोठाविलेले मास व गोठाविलेले मासळी असा फलक लावणे आवश्यक आहे.

१६) **अनुज्ञाप्ती नुतनीकरण**:- (१) मुदत संपलेल्या अनुज्ञाप्तीच्या बाबतीत सदर अनुज्ञाप्ती नुतनीकरण करून घ्यावयाची झाल्यास अनुज्ञाप्ती प्राधिकारी यांचेकडे एक महिन्याचे आंत अनुज्ञाप्तीचे नुतनीकरण करण्याबाबतचा अर्ज अनुज्ञाप्ती शुल्कासह सादर करावा लागेल. (२) असे अनुज्ञाप्तीचे नुतनीकरण करण्याबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यावर अनुज्ञाप्ती प्राधिकारी जर अनुज्ञाप्तीच्या शर्तींचे किंवा उपविधीचे उल्लंघन झालेले नसल्यास अनुज्ञाप्ती नुतनीकरण करून देतील. मात्र अनुज्ञाप्ती प्राधिका-याचे मत याऐवजी असल्यास अनुज्ञाप्तीचे नुतनीकरण केले जाणार नाही आणि अशा अनुज्ञाप्तीचे नुतनीकरण नाकारल्याची कारणे अनुज्ञाप्ती धारकास कळविण्यात येतील. (३) ३१ डिसेंबर पुर्वी अनुज्ञाप्ती नुतनीकरणाचा अर्ज अनुज्ञाप्ती शुल्कासह केलेला नसल्यास दिरंगाई शुल्क रू.५०/- दरमहा किंवा त्याचा काही भाग १ एप्रिलपासून आकरण्यात येईल असे नुतनीकरणाचे अनुज्ञाप्ती शुल्कासह ३० जुनपुर्वी केला नाही तर अनुज्ञाप्तीचे नुतनीकरण होणार नाही आणि अनुज्ञाप्तीधारकास त्यास अनुज्ञाप्तीसाठी अर्ज करावा लागेल. (४) ३१ डिसेंबर नंतर अनुज्ञाप्ती समाप्त होईल. तद्नंतर अनुज्ञाप्तीधारक हा त्याने या अनुज्ञाप्तीखाली

पाठविलेला उद्योग किंवा धंदा अनुज्ञप्तीशिवाय सुरू आहे असे गृहित धरण्यात येईल अशा वेळेपर्यंत तो अनुज्ञप्ती नुतनीकरणाचा अर्ज आवश्यक अनुज्ञप्ती शुल्कासह तसेच दिरंगाई शुल्कासह भरीत नाहीत.

**अनुज्ञप्ती निलंबित आणि दिरंगाई रद्द करणे :-**

१) जर अनुज्ञप्ती प्राधिका-याला या कारणाची खात्री असल्यास

अ) कोणत्याही अनुज्ञप्तीधारकाने दुर्व्यपदेशनाने किंवा लबाडीने अनुज्ञप्ती प्राप्त केलेली आहे किंवा

ब) कोणतेही निर्बंध आणि शर्ती मात्र ज्याकरीता अनुज्ञप्ती देण्यात आलेली आहे त्याचे उल्लंधन झालेले आहे किंवा अंमलात आणण्यास टाळाटाळ करण्यात आलेली आहे किंवा

क) की अनुज्ञप्तीकरीता असलेल्या कोणत्याही अधिनियमातील, नियमातील उपविधीतील तरतुदी ज्या लागु आहेत. गोठविलेले मटण किंवा गोठविलेले मासे यांच्या विक्रीच्या बाबतीत अनुज्ञप्ती धारकाने त्यांचे उल्लंघन केलेले आहे किंवा

ड) की असे करण्याकरीता भाग पाडणारे गोठविलेले मांस किंवा गोठविलेले मांस विक्री बंद करण्याकरीता इतर कोणतीही कारणे असल्यास अनुज्ञप्ती प्राधिकारी अशा विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीकरीता अनुज्ञप्ती निलंबित करेल किंवा रद्द सुध्दा करेल.

२) अनुज्ञप्ती निलंबित किंवा रद्द करण्याचे आदेश देण्यापुर्वी अनुज्ञप्ती धारकाला अनुज्ञप्ती प्राधिकारी कारणे दाखवा सुचना जारी करेल ज्यामध्ये अनुज्ञप्ती ठराविक काळाकरीता निलंबित का करण्यात येऊ नये किंवा रद्द करण्यात येऊ नये अशी बाब असेल तसे अशा वेळेत जो सदर सुचनेत विनिर्दिष्ट केलेले असेल.

३) अनुज्ञप्ती प्राधिका-याने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत अनुज्ञप्तीधारकाला कारणे दाखविता आली नाहीत किंवा अनुज्ञप्तीधारकाने दिलेल्या कारणाकरीता अनुज्ञप्ती प्राधिकारी समाधानी नसेल तर अनुज्ञप्ती प्राधिकारी, अनुज्ञप्ती ठराविक

कालावधीकरीता निलंबित करेल किंवा अशी बाब असेल तसे अनुज्ञाप्ती एकाच वेळी रद्द करेल.

४) अशा निलंबित केलेल्या किंवा रद्द केलेल्या अनुज्ञाप्ती बाबतीत धंदा पुढे चालु ठेवल्यास ते अनुज्ञाप्ती विना करण्यात येत आहे असे समजण्यात येईल.

१६) अनुज्ञाप्ती धारकाने अनुज्ञाप्तीच्या शर्तीने उल्लंघन केलेले आहे असे आढळून आल्यास अनुज्ञाप्ती प्राधिकारी त्याला बोलावून विहीत केलेल्या कालावधीमध्ये उल्लंघनाची दुरूस्ती करून घेईल आणि उल्लंघनाची दुरूस्ती विहीत कालावधीत केली नाही तर अनुज्ञाप्तीधारकाने ठेवलेली प्रतिभूती ठेव बिन व्याजी गमाविलेली आहे असे गृहित धरण्यात येईल आणि त्याला नवीन प्रतिभूती ठेव बिल व्याज भरण्याकरीता जबाबदार धरण्यात येईल. जर त्याची अनुज्ञाप्ती निलंबित किंवा रद्द केलेली नसेल, अनुज्ञाप्तीच्या शर्तींचे उल्लंघन केले नसल्यास, परंतु जर अनुज्ञाप्तीधारक अनुज्ञाप्ती प्राधिका-याने दिलेल्या विहीत मुदतीत प्रतिभूती ठेव ठेवण्यास अयशस्वी ठरला तर अनुज्ञाप्ती आपोआप रद्द ठरेल.

१७) अनुज्ञाप्ती निलंबित किंवा रद्द करण्याच्या कोणत्याही कारणास बाधा येणार नाही किंवा परिणाम होणार नाही, कोणत्याही दाव्यात किंवा मागणीत जी आयुक्तांनी याखाली किंवा याऐवजी केलेली आहे आणि त्यास अनुज्ञाप्ती निलंबित किंवा रद्द करणे प्रसंगी अनुज्ञाप्तीधारकाने अनुज्ञाप्तीखाली भरलेल्या कोणत्याही रकमेचा कोणताही परतावा जो काय असेल तो अनुज्ञाप्ती धारकाला मिळणार नाही.

दिनांकित

अनुज्ञाप्ती प्राधिकारी,
नाशिक महानगरपालिका,नाशिक

हि अनुज्ञाप्ती यापुढे नुतनीकरण केलेली आहे.

| अ.क्र. | शुल्क मिळाल्यास पावती क्रमांक | तारीख | शुल्क रूपये | अनुज्ञाप्ती वैध आहे पर्यंत | प्राधिका-याची सही |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |